RNI.NO.MAHAR/2013/55083

नि : पक्ष वृतपत्र

# संग्राम सत्तेचा

संपादक बाबा ढाकणे

www.sangramsattacha.com




अहिल्यानगर वर्षे १२ अंक ४५ गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ किंमत २ रु.

# ‘ऑपरेशन टायगर’ : ठाकरेंचे ५ खासदार जाळ्यात आलेले, पण दोन वाघांचा नकार

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**मुंबई : विधानसभा निवडणुकीत महायुतीत सत्तेत आल्यापासून ठाकरेंच्या पक्षाला पोखरण्याचे काम शिंदेंच्या शिवसेनेने हाती घेतले आहे. त्यापार्श्वभूमीवर ऑपरेशन टायगर’ हे राबवण्यात येत असून अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, माजी आमदारांना पक्षात सामील करून घेतले जात आहे. ठाकरेंचे खासदार फोडण्याची तयारी सुद्धा शिंदे गटाने केली होती. परंतु, दोन खासदारांमुळे ऑपरेशन टायगर’ बारगळले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एका मराठी वृत्तवाहिनीने हे वृत्त दिले आहे. नरेंद्र मोदी यांच्या सरकारला चंद्रबाबू नायडू आणि नितीश कुमार यांच्या आधारावर उभे राहावे लागत आहे. त्यामुळे स्थिर सरकारसाठी शरद पवार, उद्धव ठाकरे यांचे खासदार फोडण्याचे प्रयत्न अजितदादा पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याकडून सुरू आहेत.**

अजितदादा पवार यांच्याकडून शरद पवार यांचे खासदार फोडण्याचे प्रयत्न झाले होते. पण, खासदारांनी सुप्रिया सुळे यांना माहिती दिल्यावर त्यांनी थेट प्रफुल्ल पटेल यांना फोन करून नाराजी व्यक्त केली होती. यातच शिंदेंच्या शिवसेनेकडून ठाकरेंचे खासदार फोडण्याचे प्रयत्न केले जात आहेत.लोकसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेचे ९ खासदार निवडून आले आहेत. यातील सात खासदार फोडण्याचा शिंदेंच्या शिवसेनेचा प्रयत्न होता. त्यातील पाच खासदारांनी ग्रीन सिग्नल’ दाखवला होता. परंतु, दोन खासदारांनी रेड सिग्नल’ दाखवल्याने ऑपरेशन टायगर’ बारगळले. हे दोन खासदारांमधील एक उत्तर महाराष्ट्र आणि एक मराठवाड्यातील असल्याचे बोलले जात आहे.ठाकरेंचे खासदार फुटत नसल्याचे पाहून खासदारांची ऑपरेशन टायगर’ ही मोहिम थांबवण्यात आली आहे. परंतु, योग्यवेळी ही मोहिम सुरू करण्यात येणार आहे, अस सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. ठाकरेंचे खासदार फुटले असते, तर चंद्रबाबू नायडू आणि नितीश कुमार यांच्यावर असलेले भाजप अवलंबून राहावे लागले नसते. (पान २ वर)

## ७ मार्चपर्यंत शिर्डी शहरातील अवजड, तत्सम वाहतूक पर्यायी मार्गाने

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा

शिर्डी शहराच्या मध्यवर्ती भागातून गेलेल्या नगर-मनमाड रोडवरील वाढत्या ट्रॅफिकमुळे आणि भाविकांच्या होणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आणि शहरातील नागरिकांना नेहमीच वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. ( पान ४ वर )

# बारावीच्या परीक्षा सुरू असतानाच शिक्षकाला धमकी; पेपरच्या वेळेत शिक्षकाला चाकूचा धाक

**शिक्षकांना परीक्षा काळात संरक्षण देण्याची माध्यमिक शिक्षक संघटनेची मागणी ; अन्यथा बोर्डाच्या परीक्षांवर बहिष्कार टाकला जाणार : आप्पासाहेब शिंदे**



संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**अहिल्यानगर : बारावीच्या बोर्ड परीक्षांना प्रारंभ झाले असून, यामध्ये पहिल्याच पेपरदरम्यान मंगळवारी (दि.११ फेब्रुवारी) एक गंभीर घटना घडली आहे. श्री वृद्धेश्वर हायस्कूल, तिसगाव (ता. पाथर्डी) येथे एक गुंडाने पर्यवेक्षकाला चाकूचा धाक दाखवून दमदाटी केली आहे. या घटनेचा माध्यमिक शिक्षक संघटनेच्या वतीने निषेध नोंदवून, जबाबदारीवर असलेल्या शिक्षकांच्या संरक्षणाची जबाबदारी प्रशासनाने घेण्याची मागणी करण्यात आली आहे.**

**यासंदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने पाथर्डीचे तहसीलदार उध्दव नाईक व पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस सब इन्स्पेक्टर संतोष मुटकुळे यांना निवेदन दिले. यावेळी माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, अशोक दौंड, डी.सी. फकीर, सुभाष भागवत, भारत गाडेकर, आसिफ पठाण, महिंद्र राजगुरू, आत्माराम दहिफळे, बापूसाहेब कल्हापूरे, एस.आर. पालवे, व्ही.व्ही. इंगळे, सुभाष भागवत, अजय भंडारी, समाधान आराक, सुरेश मिसाळ, छबुराव फुंदे, सी.एम. कर्डिले, एन.एस. मुथा, मच्छिंद्र बाचकर, सुधाकर सातपुते, डॉ. अनिल पानखडे, अजय शिरसाठ, व्ही.पी. गांधी आदी उपस्थित होते.**

बारावी बोर्डाच्या पहिल्याच पेपरला शिक्षकांना धमकाविण्याचा प्रकार घडला असताना, शिक्षिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. पेपर संपल्यानंतर काही गुंडांनी पेपर जमा करणाऱ्या शिक्षकाची गाडी अडवून त्यांना गाडीच्या बाहेर ओढून शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे म्हंटले आहे. (पान २ वर)




# अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वार्षिक सभेत कर विषयक चर्चा

**संघटनेच्या उपाध्यक्षपदी आनंद लहामगे, सचिवपदी ॲड. सुधीर शेटे व सहसचिवपदी ॲड. निलेश चोरबेले**

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क



आनंद लहामगे ॲड. सुधीर शेटे ॲड. निलेश चोरबेले

**अहिल्यानगर: अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची नुकतीच शहरात तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या बैठकीत संघटनेच्या आगामी कार्यविषयक योजना, कर सल्लागारांसाठी असलेल्या अडचणी आणि सुधारणा यावर सखोल चर्चा करण्यात आली. संघटनेच्या उपाध्यक्षपदी कर सल्लागार आनंद लहामगे, सचिवपदी ॲड. सुधीर शेटे, तसेच सहसचिवपदी ॲड. निलेश चोरबेले यांची नियुक्ती करण्यात आली. तर कार्यकारिणी सदस्यपदी अशोक धायगुडे यांचा समावेश करण्यात आला आहे.**

या बैठकीप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष किशोर गांधी, सुनील कराळे, सोहम बरमेचा, अमित पितळे, विजयकुमार भंडारी, सचिन अकोळकर, अंबादास गाजुळ, प्रदीप वावरे, निकेत बोरा, ओमकार गोसावी, पंकज जोशी, सुनील कराळे, पुरुषोत्तम रोहिडा, करण गांधी, सुनील सरोदे, नन्नवरे आदी उपस्थित होते.

किशोर गांधी यांनी पुढील काळात शहरात एक मोठ्या प्रमाणावर कर परिषदेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. या परिषदेद्वारे व्यापारी वर्ग, सीए, कर सल्लागार आणि सामान्य नागरिक यांना नवीन कर संरचनेतील नियम व अटींची माहिती मिळवता येईल. त्याचप्रमाणे उद्योजक आणि व्यापारी वर्गाला याचा मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. आनंद लहामगे शहरातील कर सल्लागार असून, अनेक वर्षापासून ते सहकारी बँका, संस्था यांचे इनकम टॅक्स, जीएसटीचे काम पाहत आहे. तसेच नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे सहसचिव म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. ड. सुधीर शेटे हे सहकार क्षेत्रातील सहकारी संस्था व पतसंस्थेचे काम बघत असतात. ड. निलेश चोरबेले कर विषयक मार्गदर्शक असून, नवोदित युवकांना ते सातत्याने मार्गदर्शन करत आहे. तर धायगुडे यांची नव्याने कार्यकारणी सदस्यपदी समावेश करण्यात आला आहे. (पान २ वर)

# अमरधाम रस्त्यावरील भाजीबाजार गाडगीळ पटांगणातील बसवा, अन्यथा सर्व भाजी विक्रेते रस्त्यावर भाजीबाजार मांडणार

## भाजी विक्रेत्यांचे आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन



संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**अहिल्यानगर : अमरधाम समोरून कल्याण विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग जात असून या ठिकाणी मोठ्या संख्येने भाजी विक्रेते रस्त्यावरच ठाण मांडून बसत असून भाजी खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर येतात त्यामुळे या ठिकाणी वाहतूक ठप्प होऊन चक्काजाम होत असतो तासनतास लोकांना वाहतूक कोंडीच्या समस्याला सामोरे जावे लागते, महापालिकेने भाजी विक्रेत्यांना गाडगीळ पटांगणामध्ये ओटे बांधून व्यवस्था करून दिली असताना देखील भाजीवाले रस्त्यावरच भाजी विक्रीसाठी बसत आहे, सर्व भाजी विक्रेत्यांना आत मध्ये बसावे**

**गाडगीळ पटांगण मधील भाजीबाजारात भाजी विक्रेत्यांना तातडीने सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांना आतमध्ये बसवण्याची व्यवस्था करावी. या ठिकाणी अमरधाम असून येथे अंत्यविधी व दशक्रिया विधीसाठी नागरिक मोठ्या संख्येने येत असतात. वाहतूक कोंडीमुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे तरी रस्त्यावरील भाजीविक्रेत्यांना गाडगीळ पटांगणामध्ये बसण्याची व्यवस्था करावी अशी मागणी आयुक्त यांच्याकडे आ. संग्रामभैय्या जगताप यांनी केली**

**अन्यथा आम्हीही रस्त्यावर भाजी विक्रीसाठी बसू असा इशारा भाजी विक्रेत्यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना दिला.**

शहरातील गाडगीळ पटांगण मधील भाजी विक्रेत्यांनी आ. संग्राम जगताप यांच्या समवेत आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेत रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांना गाडगीळ पटांगण मध्ये बसवावे अशी मागणी निवेदनाद्वारे केली यावेळी संतोष कानडे, अजय विधाते, अक्षय निमसे यांच्यासह भाजी विक्रेते उपस्थित होते.

यावेळी आयुक्त डांगे यांनी लाईट व स्वच्छता तसेच बसण्याची व्यवस्था करण्याचे व रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांना भाजी बाजारात बसण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश दिले

# चॅम्पियन्स ट्रॉफीआधी दिग्गज चार्ज, भारतीय संघाचा इंग्लडला व्हाईट वॉश



संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**नवीदिल्ली : भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध झालेल्या ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत व्हाईट वॉश देत चॅम्पियन्स ट्रॉफीआधी आपले नाणे खणखणीत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे या मालिकेत अनेक दिग्गज खेळाडूंना आपल सूर गवसला असून चॅम्पियन्स ट्रॉफीआधी भारतीय क्रिकेट चाहत्यांनी सुटकेचा श्वास सोडला. अहमदाबादमध्ये खेळवल्या जाणाऱ्या तिसऱ्या आणि ३ एकदिवसीय मालिकेच्या शेवटच्या सामन्यात भारताने इंग्लंडला १४२ धावांनी मात दिली. या सामन्यात कर्णधार रोहित शर्मा अपयशी ठरला असला तरीही भारतीय संघाचा स्टार खेळाडू विराट कोहलीने अर्धशतकी खेळी करत महत्त्वाचे योगदान दिले आहे. तसेच, उपकर्णधार शुभमन गिलच्या शतकी खेळीने भारतीय संघाला मोठी धावसंख्या उभारण्यास मोठी मदत झाली.**

अहमदाबादमध्ये खेळवण्यात येणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकत पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण, भारतीय संघाने पहिले फलंदाजी करताना ५० षटकांमध्ये तब्बल ३५७ मोठे आव्हान समोर ठेवले. हे लक्ष्य पार करण्यासाठी सलामीला उतरलेल्या फिल सॉल्ट आणि बेन डकेट या सलामी जोडीने जोरदार सुरुवात करून दिली. यावेळी या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ६० धावांची भागीदारी केली. पण अर्शदीप सिंगने बेन डकेटला ३४ धावांवर बाद करत ही भागीदारी मोडली. तसेच, त्यानंतर फिल सॉल्टदेखील २३ धावांवर बाद झाला. यावेळी टॉम बँटनने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने ३८ धावा केल्या पण कुलदीप यादवच्या फिरकीसमोर तो बाद झाला. त्यानंतर कोणत्याही फलंदाजाला भारतीय गोलंदाजांसमोर टिकाव धरता आला नाही. कर्णधार जोस बटलर हा अवघ्या ६ धावांवर बाद झाला. (पान २ वर)

# कोपरगावात डॉ. राजेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत आई गोदावरी जन्मोत्सव पूजन, नदी स्वच्छता संवाद कार्यक्रम

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**अहिल्यानगर: गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट कोपरगाव मार्फत अभियानच्या दक्षिण गंगा “गोदावरी” स्वच्छता आणि अभियानाचा ३०१ वा आठवडा असल्याकारणाने वॉटरमॅन ऑफ इंडिया मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. राजेंद्र सिंह, सिनेअभिनेता चिन्मय उदगीरकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदींसह मान्यवरांच्या उपस्थितीत आईगोदावरी जन्मोत्सव पूजन आणि नदी स्वच्छता संवाद कार्यक्रमाचे शुक्रवारी (दि.१४ फेब्रुवारी २०२५) सकाळी १०.३० वाजता गोदावरी नदीपात्र कच-देवयानी घाट परिसर, कोपरगाव येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट अध्यक्ष आजिनाथ ढाकणे यांनी दिली.**

या कार्यक्रमासाठी पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, मुंबई मंत्रालय अवर सचिव संदिप ढाकणे, शिर्डी प्रांतधिकारी माणिकराव आहेर, शिर्डी डिवायएसपी शिरीष वमने, तहसिलदार महेश सावंत, कोपरगाव बीडीओ संदीप दळवी, कोपरगाव शहर पोनि भगवान मथुरे, कोपरगाव नगरपरिषद सीओ सुहास जगताप, कोपरगाव ग्रामीण पोनि संदीप कोळी, को.ता.एज्युकेशन सो.चे चेअरमन अशोक आण्णा रोहमारे, प्राचार्य विजय ठाणगे, कोपरगाव विद्यार्थी सहा. समितीचे अध्यक्ष हिरालाल महानुभाव, उद्योजक गोकुळ कोठारी, आयुर्वेद गुरु डॉ. रामदास आव्हाड, नाशिक नमोमि. गोदाचे अध्यक्ष राजेश पंडित आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, श्री.ढाकणे यांनी सांगितले.

नगर रिपोर्टर
अचूक, विश्वसनीय, सडेतोड...
क्राईम बुलेटिन

## ७ मार्चपर्यंत शिर्डी शहरातील अवजड, तत्सम वाहतूक पर्यायी मार्गाने

**( पान १ वरुन)** त्यामुळे प्र. अपर जिल्हादंडाधिकारी अतुल चोरमारे यांनी शिर्डी शहरातील अवजड व तत्सम वाहतूक दि. ११ फेब्रुवारी ते ७ मार्च २०२५ या कालावधीत पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. लक्ष्मीनगर टी पॉईंट, अहिल्यानगर-मनमाड हायवे (पूर्व बाजू) ते आर.बी.एल. बँक चौक, नगर-मनमाड हायवे (पूर्व बाजू) जाणारी अवजड वाहतूक हॉटेल ऋषिकेश, १८ मीटर रिंगरोड ते आर.बी.एल. बँक चौक १८ मीटर रिंगरोड या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. नगर-मनमाड हायवे (पश्चिम बाजू) स्वागत कक्ष ते नगर-मनमाड हायवे जुने कब्रस्तानपर्यतची वाहतूक काशी अन्नसन्नम ते पानमळा चारी रस्ता, प्रसादालय रोड (पोलीस स्टेशन पासून) ते विद्युत विभाग, महावितरण कार्यालयपर्यतची वाहतूक शासकीय विश्रामगृह ते विद्युत विभाग महावितरण कार्यालय, एअरपोर्टरोड चौक ते खंडोबा कॉम्प्लेक्सपर्यतची वाहतूक एअरपोर्टरोड चौक ते १८ मीटर रिंगरोडने आर.बी.एल. बँक चौक व हॉटेल ऋषिकेश, श्रीराम चौक ते नगर परिषद कार्यालय पर्यतची वाहतूक हॉटेल ऋषिकेश, १८ मीटर रिंगरोडमार्गे आर.बी.एल. बँक चौक, नवीन पिंपळवाडी रोड ते डोखे मार्केट, पिंपळाचे झाड, १५ मीटर रोडपर्यतची वाहतूक आर.बी. चौक, १८ मीटर रोड ते डोखे मार्केट, पिंपळाचे झाड, मनोजकुमार रोड ते साईश कॉर्नरपर्यतची वाहतूक हॉटेल सन अँड सँडरोड ते हॉटेल गणपती पॅलेस ते साईश कॉर्नर व धनतारा चौक ते साईबाबा संस्थान गेट क्र.१ पर्यतची वाहतूक हॉटेल गणपती पॅलेस १८ मीटर रोड ते साईनाथ मंगल कार्यालय, रुईरोड या पर्यायी मार्गे वळविण्यात आली आहे.

ऑनलाईन न्यूज नेटवर्क
यु ट्यूब,फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामसह अन्य सोशल साईटसाठी...
बातम्या व जाहिरातींसाठी
मो : 9764983002
पहा www.nagarreportar.com www.sangramsattacha.com

# शिर्डीत गावठी कट्ट्यातून हवेत फायर करून दहशत करणारे जेरबंद

## अहिल्यानगर क्राईम ब्रँच सर्च रिपोर्ट

## ३ गावठी कट्ट्यासह २ लाख ७० हजार रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**शिर्डी : शिर्डी येथे गावठी कट्टयातून हवेत फायर करून दहशत निर्माण करणाऱ्या तिघांना पोलिसांनी पकडून ३ गावठी कट्टयासह २ लाख ७० हजार रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्याची कारवाई अहिल्यानगर क्राईम ब्रँच टीमने केली आहे. गणेश आप्पासाहेब शेजवळ (वय ३४, रा.भिमनगर, शिर्डी, ता.राहाता, जि.अहिल्यानगर), अजय रत्नाकर शेजवळ (रा.भिमनगर, शिर्डी, ता.राहाता), भाऊसाहेब साहेबराव जगताप (रा.शिर्डी, ता.राहाता) असे पकडण्यात आलेल्यांची नावे आहेत.**

**एसपी राकेश ओला, श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, शिर्डी डिवायएसपी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर क्राईम ब्रँचचे पोनि दिनेश आहेर यांच्या सूचनेनुसार पोसई तुषार धाकराव, पोलीस अंमलदार गणेश भिंगारदे, बाळासाहेब नागरगोजे, रोहित येमुल, प्रमोद जाधव, रमीजराजा आत्तार, फुरकान शेख, प्रशांत राठोड, सारीका दरेकर व अरूण मोरे आदींच्या टीमने ही कारवाई केली.**



याबाबत समजलेली माहिती अशी की, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अहिल्यानगर क्राईम ब्रँचने शिर्डी परिसरात आरोपी सर्च मोहिम हाती घेतली आहे. या दरम्यान, दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी पोनि श्री.आहेर यांना माहिती मिळाली की, गणेश आप्पासाहेब शेजवळ (रा.भिमनगर, शिर्डी, ता.राहाता) याच्याकडे अग्नीशस्त्र आहे. त्याने दहशत निर्माण करण्याकरीता फायर केला असून, फायर केल्याचा व्हिडीओ त्याच्या मोबाईलमध्ये असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोनि श्री आहेर यांनी अहिल्यानगर क्राईम ब्रँच टीम पाठवण्यात आली. क्राईम ब्रँच टीमने दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी संशयीतांचा शोध घेत असता आरबीएल चौकाजवळ (शिर्डी ता.राहाता) या ठिकाणी मिळून आल्याने त्यास ताब्यात घेतले. नाव विचारले असता त्याने त्याचे नाव गणेश आप्पासाहेब शेजवळ (वय ३४, रा.भिमनगर, शिर्डी, ता.राहाता, जि.अहिल्यानगर) असे असल्याचे सांगितले. त्यास विश्वासात घेऊन अग्निशस्त्राबाबत विचारपूस केली असता त्याने मोबाईलमध्ये अग्निशस्त्रचा व्हिडीओ दाखवला. अग्नीशस्त्र हे त्याचा चुलत भाऊ अजय रत्नाकर शेजवळ याच्याकडे ठेवले असल्याची माहिती दिली. क्राईम ब्रँच टीमने पंचासमक्ष अजय रत्नाकर शेजवळ (रा. भिमनगर, शिर्डी, ता.राहाता) याच्या घरातून १ लाख ५0 हजार रु किं.त्यात ३ गावठी पिस्टल, ३ जिवंत काडतुसे व ३ रिकाम्या काडतुसाच्या पुंगळया जप्त केल्या आहेत. ताब्यातील आरोपी गणेश आप्पासाहेब शेजवळ व अजय रत्नाकर शेजवळ याच्या ताब्यातून १ लाख २० हजार रू किंमतीचे दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

ताब्यातील आरोपी गणेश आप्पासाहेब शेजवळ याच्याकडे मिळून आलेल्या गावठी पिस्टल व काडतुसाबाबत विचारपूस केली असता त्याने भाऊसाहेब साहेबराव जगताप (रा.शिर्डी, ता.राहाता), राकेश पगारे (पुर्ण नांव पत्ता माहित नाही), रोशन सोमनाथ कोते (रा.शिर्डी, ता.राहाता) यांच्याकडून प्रत्येकी १ पिस्टल व दोन जिवंत काडतुसे खरेदी करून, त्यापैकी ३ काडतुसे हवेत फायर केले असल्याचे सांगितले. पिस्टल विक्री करणाऱ्यांचा शोध घेतला असता त्यातील रोशन सोमनाथ कोते, (वय २४, रा.शिर्डी, ता.राहाता) हा मिळून आला. उर्वरित फरार आरोपींचा क्राईम ब्रँच टीम तपास करीत आहे. पकडण्यात आलेल्यांवर आरोपीविरुध्द शिर्डी पोलीस ठाण्यात गु.र.नं.११६/२०२४ आर्म ऍक्ट कायदा कलम ३/२५, ७,२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयांचा पुढील तपास शिर्डी पोलीस हे करीत आहेत.

# नोकरीचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार, नेमकं प्रकरण काय?

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**सोलापूर : गेल्या काही महिन्यापासून राज्यातून महिलांवर अत्याचार झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. अशामध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशामध्ये सोलापूरमध्ये फक्त आरोपींवरच नव्हे तर पीडित महिलेवरही गुन्हा दाखल करण्यात आल्याचे समोर आले आहे. एका उद्योजकाने संस्थेत नोकरी देतो, असे सांगून एका महिलेवर अत्याचार केल्याची घटना घडली. या घटनेत समोर आलेल्या माहितीनुसार, सोलापुरातील प्रसिद्ध उद्योजकासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणतील पीडित महिलेविरोधातदेखील एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांचा तपास सुरू असून यामध्ये आणखी कोणती माहिती समोर येते? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, सोलापुरातील एका संस्थेत अधिक्षक पदावर नोकरी लावतो, असे सांगत आरोपी प्रदीप शिंघवी पीडित महिलेवर अत्याचार केले. तसेच, संस्थेमधील दोन महिलांनी पीडितेला धार्मिक कारणावरून हीन वागणूक दिल्याचा पीडित महिलेने आरोप केला. ही पीडित महिला मुळची मुंबईची राहणारी असून तिच्या तक्रारीनुसार तिघांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ६९ आणि ऍट्रॉसिटी कायद्याच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पीडित महिलेला संस्थेच्या कामातून काढण्यात आलेले होते. पण, ती महिला संस्थेमध्ये अवैधरित्या राहत होती. मला पुन्हा कामावर घ्या नाहीतर तुमच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करेन, अशी धमकी देत एक कोटी रुपयांची खंडणी पीडित महिलेने मागितल्याचा आरोप स्वतः शिंगवी यांनी केला आहे. प्रदीप शिंगवी यांच्या फिर्यादीनुसार पीडित महिलेविरोधात देखील खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणामध्ये परस्परविरोधी तक्रार देण्यात आल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पोलिसांनी फिर्यादीच्या म्हणण्यानुसार गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही प्रकरणाची पोलीस कसून चौकशी करत आहेत. अशामध्ये सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी याबाबत सांगितले की, दोन्ही प्रकरणाचा सविस्तर तपास आम्ही करत आहोत. त्यानंतरच पुढील कारवाई केली जाणार असल्याचे ते म्हणाले.

# चोरीच्या उद्देशाने ट्रक चालकास ठार मारले

## नारायणडोह शिवारातील घटना, दोघे अटक ; नगर तालुका पोलिसांची कारवाई



संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**अहिल्यानगर : नगर तालुक्यातील नारायणडोह शिवारात चोरी करण्याच्या उद्देशाने ट्रक चालकास धारदार शस्त्राने जिवे ठार मारणाऱ्यास अर्धा तासात पाठलाग करुन पकडण्याची कारवाई नगर तालुका पोलिसांनी केली आहे. ओसवाल इंपिरीअल चव्हाण, साहेबा आनंदा गायकवाड (दोघे रा. वाळूज ता.जि. अहिल्यानगर) असे पकडण्यात आलेल्यांची नावे आहेत.**

**वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगर ग्रामीण डिवायएसपी संपतराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नगर तालुका पोर्लिस ठाण्याचे सपोनि प्रल्हाद गिते यांनी दिलेल्या सूचनेनुसार पोउपनि पतंगे, सफौ रमेश गांगर्डे, पोहेकॉ झावरे, पोकॉ बांगर, पोकॉ अन्सार शेख, पोकॉ राजू खेडकर आदींच्या टीमने ही कारवाई केली आहे.**

याबाबत समजलेली माहिती अशी की, दि.११ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०५ वाजता माहिती मिळाली की, ओसवाल इंपिरीअल चव्हाण व साहेबा आनंदा गायकवाड दोघे (रा. वाळूज ता.जि.अहिल्यानगर) यांनी एक वाळूज बायपास रोडवरुन कंटेनर घेऊन कुरणवस्ती, नारायणडोह शिवार या ठिकाणी लाईटचे केबल पोल व इलेक्ट्रीक पोलला धडक देऊन नुकसान केले आहे. एक अनोळखी व्यक्ती जखमी अवस्थेत रोडच्या बाजूला पडलेला आहे, अशी माहिती मिळाल्याने सपोनि गिते व पोलीस स्टाफ सह तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. त्या ठिकाणी गेल्यानंतर नवनाथ मुरलीधर जायभाय यांच्याकडून समजले की, सकाळी १०.३० ते ११.३० वा.च्या दरम्यान ओसवाल इंपिरीअल चव्हाण व साहेबा आनंदा गायकवाड या दोघांनी कंटेनरच्या चालकास चाकूने मारले असून ते त्यांनी कंटेनर इलेक्ट्रीक पोलला धडक देवून त्यांचा पाठलाग करत असताना नारायणडोह रेल्वे ब्रीज खाली त्यांना अडवले असता त्यांनी कंटेनर ब्रीजखाली सोडून देऊन मला चाकूचा धाक दाखवून कुरणवस्तीकडे जाणाऱ्या रेल्वे पटरीने पळाले आहेत, अशी माहिती दिली.

यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ एसपी राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीण डिवायएसपी संपतराव भोसले, अहिल्यानगर क्राईम ब्रँचचे पोनि दिनेश आहिरे यांना माहिती दिली.आरोपीच्या शोध घेतला असता आरोपी हे रेल्वे पटरीने पळत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस स्टाफ तात्काळ रेल्वे पटरीकडे जाऊन दोन ते अडीच किलोमीटर आरोपींचा पाठला करुन आरोपींना पकडले. त्यांच्या कपडयांवर रक्ताचे डाग दिसून आले. कंटेनरची चावी खिशात मिळून आली. कंटेनर कोठे आहे असे विचारले असता त्यांनी कंटेनर हा ब्रीजच्या खाली उभा केला असल्याचे सांगून, त्यांनी गुन्हा केल्याची कबूली दिली.

गेला माल २८ लाख रुपये किंमतीचा हरभरा व ४० लाख रु. किं.चा कंटेनर हस्तगत करुन आरोपीविरुध्द भा.न्या. संहिता कलम १०३(१),३०९(६),१११,३२४(४)(५),३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या पुढील अधिका तपास नगर तालुका पोलिस ठाण्याचे सपोनि प्रल्हाद गिते हे करत आहेत.

# अपहरण झालेल्या अल्पवीयन मुलीचा ३ महिन्यानंतर शोध व सुटका : आरोपी अटक

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**अहिल्यानगर : अपहरण झालेल्या अल्पवीयन मुलीचा ३ महिन्यानंतर शोध घेऊन पोलिसांनी सुटका केली असून, आरोपी अटक करण्यात आला आहे. आदिनाथ गीताराम निशाने (रा. खूडसरगाव, ता. राहुरी) असे पकडणण्यात आलेल्याचे नाव आहे. एसपी राकेश ओला, श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, श्रीरामपूर डिवायएसपी डॉ.बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिस ठाण्याचे पो.नि.संजय आर.ठेंगे, पोसई धर्मराज पाटील, पोहेकॉ. राहुल यादव, पोकॉ.अशोक शिंदे पोकॉ. गणेश लिपणे पोकॉ. आदिनाथ पाखरे, मपोकॉ. वृषाली कुसळकर व श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक मोबाईल सेलचे पो. ना.संतोष दरेकर यांनी ही कारवाई केली आहे.**

राहुरी पोलीस ठाण्यात येथे गु.र.नंबर १२००/२०२४ इछड १३७(२), प्रमाणे दि.१७ नोव्हेंबर २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. गुन्हयामध्ये अपहरीत मुलीबाबत काहीएक माहिती उपलब्ध नसतांना मदतीने व तांत्रिक तपासाद्वारे तसेच अथक परिश्रम घेऊन गुन्हयातील अपहरीत मुलीचा माग काढून तिचा शोध घेतला. तिची सुटका करून तीला राहुरी पोलीस ठाण्यात आणून तिचा जबाब नोंदवून पीडितेस तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे. गुन्ह्यात वाढीव कलम लावून आरोपी आदिनाथ गीताराम निशाने (रा. खूडसरगाव, ता. राहुरी) यास अटक करण्यात आली. आरोपीकडे विचारपूस करून अधिक तपास पोउपनि धर्मराज पाटील, पोकॉ. गणेश लिपने हे करत आहेत.

ऑपरेशन मुस्कान अंतर्गत राहुरी पोलीस स्टेशन हद्दीतील ५५ मुलींचा शोध घेऊन व ६ अल्पवयीन मुलांचा शोध घेऊन त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. आरोपींना अटक करून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

## ७ मार्चपर्यंत शिर्डी शहरातील अवजड, तत्सम वाहतूक पर्यायी मार्गाने

(पान १ वरुन)
**त्यामुळे प्र. अपर जिल्हादंडाधिकारी अतुल चोरमारे यांनी शिर्डी शहरातील अवजड व तत्सम वाहतूक दि. ११ फेब्रुवारी ते ७ मार्च २०२५ या कालावधीत पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.**

लक्ष्मीनगर टी पॉईंट, अहिल्यानगर-मनमाड हायवे (पूर्व बाजू) ते आर.बी.एल. बँक चौक, नगर-मनमाड हायवे (पूर्व बाजू) जाणारी अवजड वाहतूक हॉटेल ऋषिकेश, १८ मीटर रिंगरोड ते आर.बी. एल. बँक चौक १८ मीटर रिंगरोड या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. नगर-मनमाड हायवे (पश्चिम बाजू) स्वागत कक्ष ते नगर-मनमाड हायवे जुने कब्रस्तानपर्यतची वाहतूक काशी अन्नसन्नम ते पानमळा चारी रस्ता, प्रसादालय रोड (पोलीस स्टेशन पासून) ते विद्युत विभाग, महावितरण कार्यालयपर्यतची वाहतूक शासकीय विश्रामगृह ते विद्युत विभाग महावितरण कार्यालय,

एअरपोर्टरोड चौक ते खंडोबा कॉम्प्लेक्सपर्यतची वाहतूक एअरपोर्टरोड चौक ते १८ मीटर रिंगरोडने आर.बी.एल. बँक चौक व हॉटेल ऋषिकेश, श्रीरामचौक ते नगरपरिषद कार्यालय पर्यतची वाहतूक हॉटेल ऋषिकेश, १८ मीटर रिंगरोडमार्गे आर.बी.एल. बँक चौक, नवीन पिंपळवाडी रोड ते डोखे मार्केट, पिंपळाचे झाड, १५ मीटर रोडपर्यतची वाहतूक आर.बी. चौक, १८ मीटर रोड ते डोखे मार्केट, पिंपळाचे झाड, मनोजकुमार रोड ते साईश कॉर्नरपर्यतची वाहतूक हॉटेल सन अँड सँडरोड ते हॉटेल गणपती पॅलेस ते साईश कॉर्नर व धनतारा चौक ते साईबाबा संस्थान गेट क्र.१ पर्यतची वाहतूक हॉटेल गणपती पॅलेस १८ मीटर रोड ते साईनाथ मंगल कार्यालय, रुईरोड या पर्यायी मार्गे वळविण्यात आली आहे.

# दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने अभिजात मराठीचा ऑनलाईन जागर'!

## व्हिडिओ पाठवून सहभागी होण्याचे आवाहन

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर उत्कृष्ट व्हिडिओ व कलाकृतीला प्रसिद्धी देण्यात येईल -**

महासंवाद - https://mahasamvad.in/
एक्स - https://twitter.com/MahaDGIPR
फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR
इन्स्टाग्राम - https://www.instagram.com/mahadgipr
युट्यूब - https://www.youtube.co/MHRSHTRDGIPR
टेलिग्राम चॅनल - https://t.me/MahaDGIPR

संग्राम सत्तेचा वृत्तसेवा
ऑनलाईन नेटवर्क

**अहिल्यानगर : दि. २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अभिजात मराठीचा ऑनलाइन जागर' हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात आपल्या कलागुणांचा व्हिडिओ शेअर करून देश विदेशातील मराठी माणसांपर्यत पोहोचण्याची संधी मिळणार आहे.**

### या उपक्रमात कसे सहभागी व्हाल?

आपण स्वतः कवी, लेखक, कलाकार, गायक असाल तर आपल्या स्वरचित कवितेचा अथवा आपल्या कलाकृतीचा एक सुंदर व्हिडिओ तयार करून आम्हाला पाठवा. केवळ आपल्याच कविता नाही तर इतर मान्यवर कवींच्या कवितांचे सादरीकरणही ( वाचन )आपण करू शकता. याबरोबरच गझल वाचन, गायन, लोककला सादरीकरण अशा अनेक स्वरूपात आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता.

अभिजात मराठीच्या या ऑनलाईन जागरामध्ये आपण अभंग, पोवाडे, नाट्यछटा, लघुकथा, गायन, भारुड आधी कलांच्या माध्यमातून सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या उत्सवात आपला सहभाग हा आपल्या भाषेचा गौरव वाढविणारा ठरेल. तर चला मग करा रेकॉर्ड आपला व्हिडिओ आणि पाठवा आम्हाला.

आपले व्हिडिओ हे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंवाद' या पोर्टल वर आणि महासंचालनालयाच्या राज्यभरातील कार्यालयांच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येतील.

अहिल्यानगरमधील नागरिकांनी आपले व्हिडिओ वसळीविश्रेसारळश्र.लो आणि वळेपरसरी१२सारळश्र.लो **या ईमेलवर अथवा. ९८९२६६०९३३, ७५०४६९६७८६ आणि ९४२०० २२४२२ या व्हॉट्सअँप क्रमांकावर पाठवावेत.**

महाराष्ट्राला साहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. ९८ वे अखील भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषेच्या श्रीमंतीचा उत्सव साजरा करण्याची संधी आहे. आपल्या शब्दांनी आणि कलाकृतींनी ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिक संस्मरणीय बनवावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

संग्राम सत्तेचा वृत्तपत्राचे मालक, प्रकाशक, संपादक बाबासाहेब दत्तात्रय ढाकणे यांनी मुद्रक सुनिल महामुनी यांच्या शिवकृपा प्रिंटर्स, देवकरगल्ली, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथे छापून नागरदेवळेफाटा, बुऱ्हाणनगररोड, बोरुडेमळा, अहमदनगर येथे प्रसिद्ध केले. पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे. संपादक : बाबासाहेब ढाकणे मो. ९७६४९८३००२ (वृत्तपत्रामधून प्रसिद्ध होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व अहमदनगर न्यायकक्षेत) sangram.sattacha@gmail.com